# मेट्रो-३ चे सरासरी ७५ टक्के काम पूर्ण

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेचे ३१ मार्चपर्यंत सरासरी ७५ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती एमएमआरसीएलने एका व्हिडीओच्या माध्यमातून दिली आहे. या कामांमध्ये मेट्रो भुयार, बेस स्लॅब, सिव्हील वर्क या कामांचा समावेश आहे. कुलाबा-वांद्रे-सिप्झ या ३३.५ किमी मार्गिकेचे काम मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून वेगाने सुरू आहे. एमएमआरसीएलने फेसबुकवर ३१ मार्चपर्यंतच्या कामकाजाचा स्टेशननिहाय आढावा व्हिडीओच्या माध्यमातून स्पष्ट केला आहे. या व्हिडीओनुसार कप परेड येथील स्थानकाचे ७२.४० टक्के, विधानभवन ८०.५० टक्के, चर्चगेट ७७.५५ टक्के, हुतात्मा चौक ७१.४० टक्के, सीएसटी ७४.२० टक्के, काळबादेवी २१.४८ टक्के, गिरगाव २१.१६ टक्के, ग्रॅण्ट रोड २७.२० टक्के, मुंबई सेंट्रल ६८.४५ टक्के, महालक्ष्मी ५८.५८ टक्के, सायन्स म्युझियम ६८.७५ टक्के, ए. ए. चौकी २७.१० टक्के, वरळी ५३.८५ टक्के, सिद्धिविनायक ७६.२० टक्के, दादर ५० टक्के, शितलादेवी ४०.१५ टक्के, धारावी ६९.५६ टक्के, बीकेसी ६४.९० टक्के, विद्यानगरी ७०.४० टक्के, सांताक्रुझ ७५.६८ टक्के, सीएसआयए ७५.६५ टक्के, सहार रोड ७३.०६ टक्के, सीएसआयए ७४ टक्के, मरोळ नाका ८०.५३ टक्के, एमआयडीसी ८२.४० टक्के, सिप्झ ८०.४५ टक्के स्थानकांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. मेट्रो ३ मार्गिकेचे काम वेगाने आणि नियोजनात्मक काम करण्यात येत असून २०२१ वर्षअखेरीस संपूर्ण काम पूर्ण करण्याचा एमएमआरसीएलचा मानस आहे.